**<u>ठळक बातम्या</u>**

- जागतिक पातळीवरची आव्हानं पेलत भारतीय अर्थव्यवस्था विकासमार्गावर वाटचाल करत असल्याचं केंद्रीय अर्थमंत्र्यांचं प्रतिपादन
- उद्योगांनी सरकारवर अवलंबून न राहता स्पर्धेत उतरावं असं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्र्यांचं आवाहन

- महाकुंभाच्या यशस्वी आयोजनाबद्दल प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केलं समाधान.

- नौदलाच्या जहाजविरोधी क्षेपणास्त्राची चाचणी यशस्वी

**आणि**

- रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात विदर्भाच्या पहिल्या डावात ३७९ धावा

**<><><><><>**

जागतिक पातळीवरची आव्हानं पेलत भारतीय अर्थव्यवस्था विकासमार्गावर वाटचाल करत असल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत आयोजित माध्यमांशी संवाद कार्यक्रमात आज त्या बोलत होत्या. सध्याच्या काळात जागतिक पुरवठा साखळीत अडथळे उद्भवण्याचा धोका असून आता जगाचं भविष्य केवळ विकसित देशांच्या हाती राहिलेलं नाही, असं त्या म्हणाल्या. नवीन जग व्यापार आणि तंत्रज्ञानातून आकाराला येत असून भारताला त्यादृष्टीने धोरणं आखावी लागतील असं मत त्यांनी व्यक्त केलं. येत्या काळात वाढत्या मध्यमवर्गाच्या

तसंच गरीबांच्या आणि उद्योजकांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचं आव्हान असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

उद्योगांनी सरकारवर अवलंबून न राहता स्पर्धेत उतरावं असं आवाहन केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी उद्योजकांना केलं. ते आज मुंबईत आयएमसी चेंबर ऑफ कॉमर्सने आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलत होते. अनुदान, उच्च आयात शुल्क अशा सरकारच्या मदतीवर कधीपर्यंत अवलंबून राहणार असा प्रश्न त्यांनी विचारला. एक देश म्हणून या सुरक्षित वातावरणातून आणि बचावात्मक पावित्र्यातून बाहेर पडणं गरजेचं आहे, नवोन्मेष, उत्पादकता वाढवणं, कौशल्य आणि कार्यक्षमता सुधारणं यातून स्पर्धात्मकता वाढेल असं गोयल म्हणाले. आपण जोपर्यंत स्पर्धात्मक होत नाही, जगासोबतचा व्यापार वाढता नाही तोपर्यंत देशाला विकसित करण्याचं १४० कोटी नागरिकांचं ध्येय साध्य होणार नाही, असं गोयल म्हणाले. उद्योगांनी आपली गुणवत्ता वाढवावी असं आवाहन गोयल यांनी यावेळी केलं. मेक इन इंडियासारख्या उपक्रमांमुळे देश जागतिक बाजारात मोठी भूमिका पार पाडण्यासाठी सज्ज झाला आहे, असंही गोयल म्हणाले.

<><><><><>

महाकुंभ हा देशाच्या एकतेचा महायज्ञ होता असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. प्रयागराजमध्ये महाकुंभाची सांगता झाल्यानंतर आज प्रधानमंत्र्यांनी आपल्या भावना त्यांच्या समाजमाध्यमावरच्या ब्लॉगमध्ये व्यक्त केल्या. भारताला आपल्या परंपरेचा अभिमान असून त्यात आता नवी

ऊर्जा भरली जात आहे. देशाचं नवं भविष्य लिहिण्याचा हा काळ आहे. महाकुंभाला आलेले कोट्यावधी लोक हा केवळ एक विक्रम नसून तो समृद्ध भारतीय परंपरेचा पाया आहे. येणाऱ्या शतकांमध्ये देशाची परंपरा आणि भारतीय संस्कृती अधिक समृद्ध आणि सशक्त होईल. महाकुंभाच्या यशस्वी आयोजनाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केलं.

<><><><><>

प्रयागराज इथल्या महाकुंभ मेळ्यासाठी रेल्वेने १६ हजार रेल्वेगाड्या चालवल्या यात जवळपास साडे चार कोटी भाविकांनी प्रवास केल्याचं रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. ते प्रयागराज जंक्शन  इथं आज वार्ताहरांशी बोलत होते. या सोहळ्याची तयारी रेल्वे मागच्या अडीच वर्षांपासून करत असून यासाठी ५ हजार कोटी रुपये खर्च केल्याचं त्यांनी सांगितलं.  भाविकांना सुरळितपणे ये जा करता यावी यासाठी महाकुंभ मेळ्सासाठी २१ हून अधिक उड्डाणपूल आणि भुयार बांधले. जीआरपी, पोलीस, आरपीएफ आणि रेल्वेच्या मदतीने या मेळ्याचं यशस्वी आयोजन झालं असं वैष्णव म्हणाले. यंदाचा महाकुंभ मेळा श्रद्धा आणि एकतेचं प्रतीक होता असं वैष्णव म्हणाले.

उत्तरप्रदेशात प्रयागराज इथं महाकुंभ मेळा काल समाप्त झाला. मकर संक्रांतीपासून सुरू झालेल्या या महाकुंभामध्ये 66 कोटींहून अधिक भाविकांनी पवित्र संगमावर स्नान केलं. भारतीय हवाई दलानं घाटांवर पुष्पवृष्टि करुन भाविकांना संस्मरणीय आनंद दिला.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू सध्या गुजरातच्या दौऱ्यावर आहेत. आज सकाळी राष्ट्रपतींनी स्टॅच्यू ऑफ युनिटीला भेट देऊन सरदार वल्लभभाई पटेल यांना पुष्पांजली अर्पण केली. त्यानंतर राष्ट्रपतींनी एकता नगर इथं जंगल सफारीचा आनंद घेतला. एकता कौशल्य विकास केंद्राला राष्ट्रपती भेट देणार असून तिथल्या प्रशिक्षणार्थींशी त्या संवाद साधणार आहेत. त्यानंतर अहमदाबाद इथल्या राष्ट्रीय डिझाईन संस्थेच्या ४४ व्या दीक्षांत समारंभाला राष्ट्रपती उपस्थित राहतील.

<><><><><>

संरक्षण संशोधन आणि विकास संघटना आणि भारतीय नौदलानं ओडिशातील चंडीपूर इथल्या एकात्मिक चाचणी केंद्रावरून पहिल्याच नौदल जहाजविरोधी क्षेपणास्त्राची यशस्वी उड्डाण चाचणी घेतली. या चाचण्यांमधून भारतीय नौदलाच्या सीकिंग हेलिकॉप्टरमधून जहाजावर क्षेपणास्त्र डागण्याची क्षमता सिद्ध झाली. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी यशस्वी उड्डाण चाचण्यांसाठी DRDO, भारतीय नौदल आणि उद्योगांचं अभिनंदन केलं. या चाचण्यांमुळं क्षेपणास्त्राचं मॅन-इन-लूप वैशिष्ट्य सिद्ध झाल्याचं संरक्षण मंत्रालयानं एका निवेदनात म्हटलं आहे.

<><><><><>

मराठी भाषा गौरव दिन आज राज्यभरात साजरा होत आहे.

२७ फेब्रुवारी हा कविवर्य कुसुमाग्रज म्हणजे विष्णू वामन शिरवाडकर यांचा जन्मदिवस. त्यांच्या जयंतीचं औचित्य साधून हा दिवस साजरा केला जातो. यानिमित्त राज्यभरात विविध कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी मराठी भाषा गौरव दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या तसंच कुसुमाग्रजांना अभिवादन केलं. ज्येष्ठ नेते शरद पवार आणि काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनीही  कुसुमाग्रजांच्या कार्याचं स्मरण करून त्यांना अभिवादन केलं. तसंच मराठी भाषा गौरव दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त नाशिकच्या शिरवाडे वणी इथं 'कवितेचं गाव' साकार होत असल्याची माहिती, मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी दिली. याठिकाणी कुसुमाग्रजांचं साहित्य, कविता आणि अन्य थोर साहित्यिकांचं लेखन संग्रहित केलं जाणार आहे.

महाराष्ट्र पोस्टल सर्कलनं आज मराठी भाषा गौरव दिनानिमित्त पोस्ट कार्ड जारी  केलं. सुलेखनकार अच्युत  पालव आणि लेखक गणेश मतकरी यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या अंतीम सामन्याच्या दुसऱ्या दिवशी विदर्भ संघाचा पहिला डाव ३७९ धावांवर आटोपला.

केरळच्या संघानं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. फलंदाजीसाठी उतरलेल्या विदर्भ संघाची सुरुवात अडखळत झाली. मात्र दानिश मालेवार यानं झुंजार शतकी खेळी करत संघाचा डाव सावरला.

केरळकडून ईडन  टॉम  आणि निधीश यांनी प्रत्येकी आणि नेदुमंकुझी बसील याने दोन गडी बाद केले.

काल पहिल्या दिवशी खेळ संपला तेव्हा विदर्भाच्या ४ बाद २५४ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

आयसीसी विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेत आज पाकिस्तानचा मुकाबला बांगलादेश बरोबर रावळपिंडी इथं होणार आहे. आज दुपारी अडीच वाजता हा सामना सुरु होणार आहे. सद्यस्थितीत अ गटात बांगलादेश तिसऱ्या तर पाकिस्तान चौथ्या स्थानावर आहे.

<><><><><>

भोपाळच्या युनियन कार्बाइड इंडिया लिमिटेड कंपनीत झालेल्या वायू दुर्घटनेतील विषारी कचरा मध्य प्रदेशातील धार जिल्ह्यातील पिथमपूर भागात हलवून त्याची विल्हेवाट लावण्याच्या मध्य प्रदेश उच्च न्यायालयाच्या आदेशात हस्तक्षेप करण्यास सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी नकार दिला.

<><><><><>

आता ऐकूया हवामानवृत्त....

*देशाच्या उत्तर आणि वायव्य भागात पश्चिमी वाऱ्यांच्या प्रकोपामुळे पावसाची शक्यता आहे. काश्मीरच्या डोंगराळ भागात कालपासून हिमवृष्टी होत असून त्यामुळे नदी नाल्यांमधे पाणी वाढलं आहे. गुलमर्ग इथं दोन ते तीन फूट जाडीचा बर्फाचा थर*

*साचला असून त्यामुळे स्थगित झालेल्या खेलो इंडिया हिवाळी क्रीडास्पर्धा सुरु होण्याची शक्यता आहे. काश्मीर खोऱ्यात पुढचे दोन दिवस हिमवृष्टी होण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने वर्तवली आहे. हिमाचल प्रदेशातही हिमवृष्टी होत असून राज्यातल्या महत्त्वाच्या महामार्गांवर किमान एक फूट जाडीचा बर्फाचा थर साचल्यामुळे अटल बोगद्यासह २११ रस्त्यांवर वाहतूक ठप्प आहे. पुढचे दोन दिवस हिमवृष्टीसह पावसाचीही शक्यता आहे. पंजाब, हरियाणा आणि उत्तराखंडमधे मुसळधार पावसाबरोबरच गारपिटीचा इशारा हवामानविभागाने दिला आहे., चंडीगढ, राजस्थान, उत्तरप्रदेश आणि मध्यप्रदेशच्या काही भागात पावसाची शक्यता आहे. कोकण आणि गोव्यात वातावरणात दमटपणा वाढला असून उष्णतेची लाट आहे. मुंबईत सलग दोन दिवस पारा ३८ अंश सेल्सियसच्या पुढे गेला होता.*

*//<><><><><>//*